अस्मिता शिक्षण मंडळ, अमरावती

द्वारा संचालित

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती

## कला, वाणिज्य, विज्ञान व समाजविज्ञान


Reaccredited with 'A' Grade by NAAC (3.07 CGPA)



# माहिती पत्रक

## २०२३-२४

सामाजिक क्रांतीचे प्रणेते



महात्मा जोतीराव फुले

# ।। विद्यापीठ गीत ।।

विद्या चिंतन । विद्या मंथन
विद्या सर्जन । विद्या जीवन ।।

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ।।
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।। १ जनमन

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मरोग निष्काम आचरुन, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओलाव्याने, मानस मोहरले ।। २ जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढयांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ।। ३
जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।।

*** गीतकार ***
प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ

*** संगीतकार ***
सूरमणी प्रा. कमलताई भोंडे

# अनुक्रमणिका
## (२०२३-२४)


| अ.क्र. विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| १. क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले (चरित्र परिचय) | १ |
| २. महाविद्यालयाची वाटचाल | ३ |
| ३. महाविद्यालयीन शैक्षणिक वर्षारंभ | ४ |
| ४. प्रवेश | ४ |
| ५. शुल्क | ७ |
| ६. सवलती व विद्यावेतने | १० |
| ७. विद्यापीठाचे अध्यादेश | १२ |
| ८. पाठ्यक्रम | १३ |
| ९. करिअर कट्टा | २७ |
| १०. ग्रंथालय | २८ |
| ११. उपस्थिती | २९ |
| १२. शारीरिक शिक्षण / राष्ट्रीय सेवा योजना | ३१ |
| १३. क्रीडा आणि खेळ | ३१ |
| १४. प्रोत्साहनपर विशेष गुण योजना | ३१ |
| १५. सामान्य नियम | ३३ |
| १६. शिस्तपालनाचे विशेष नियम | ३५ |
| १७. शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक | ३८ |
| १८. यशाचे मानकरी | ४० |
| १९. महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी | ४२ |
| २०. अस्मिता शिक्षण मंडळ कार्यकारिणी व महाविद्यालय विकास समिती | ४४ |
| २१. प्रवेश शुल्क | ४५ |
| २२. वार्षिक दिनदिर्शिका (२०२३-२४) | ५७ |
| २३. वार्षिक सुट्ट्या | ५९ |
| २४. अस्मिता शिक्षण मंडळ, अमरावती-संचालित शाखा | ६० |

# क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म दि. ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. त्यांच्या आईचे नाव चिमनाबाई व वडिलांचे नाव गोविंदराव होते. त्यांच्या वडिलांचा शेती व फुलांचा व्यवसाय होता. त्यांची आर्थिक स्थिती उत्तम असल्यामुळे समाजात त्यांचा मानसन्मान होता. महात्मा जोतीराव फुले हे संपूर्ण महाराष्ट्राला शिक्षणाचे महत्व पटवून देणारे कर्तेमहापुरुष ठरतात. बहुजनांच्या मागासलेपणाचे एकमेव कारण त्यांचा आशिक्षितपणा असून शिक्षणापासून वंचित समाजाच्या अधोगतीचे दुष्परिणाम त्यांनी आपल्या खालील अखंडातून मांडले आहेत ते म्हणतात,

विद्येविना मती गेली । मती विना निती गेली ।।
निती विना गती गेली । गती विना वित्त गेले ।।
वित्त विना क्षुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

त्यांनी समाज व्यवस्थेत नगण्य समजल्या जाणाऱ्या स्त्रीला शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षित करुन पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात १ जाने. १८४८ रोजी मुलींची पहिली शाळा सुरु केली. स्त्री शिक्षणासंबंधी ते म्हणतात, कुटुंबातील एक माणूस शिकला तर फक्त तोच सुशिक्षित होतो, परंतु एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब सुशिक्षित होते. म्हणून सर्वच समाजातील स्त्रियांनी शिक्षणाची कास धरली पाहीजे असे त्यांना वाटत होते. परंतु त्यांच्या या शैक्षणिक कार्याला धर्मविरोधी वर्तन मानून विरोध करण्यात आला. तरीही कुठल्याही विरोधाची पर्वा न करता त्यांनी समाजातील स्त्री व क्षूद्राच्या शिक्षणाकरिता स्वतंत्रपणे शाळा सुरु केली. अशा प्रकारेचे कार्य करणारे महात्मा जोतीराव फुले हे पहिले भारतीय होते.

त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात जातिभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या चळवळी, बालहत्याप्रतिबंध गृह, बालविवाह, स्त्री-पुरुष समानता, महिला केशवपन, विधवा पुनर्विवाह, अंधश्रद्धा निमूर्लन, सत्यशोधक समाजाची स्थापना, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत, शेतीविषयक मार्गदर्शन (शेतकी शाळा) व धार्मिक चिकित्सा इत्यादी समाजातील समस्यावर अखंडपणे कार्य व प्रबोधन केले असल्याचे दिसून येते. समाजातील विविध प्रश्नांवर तसेच समस्यांवर कार्य करणारा एकमेव महापुरुष म्हणजे महात्मा जोतीराव फुले होत.

त्यांच्या ग्रंथ संपदेत तृतीयरत्न (नाटक), गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड सार्वजनिक सत्यधर्म, इशारा, अंखड (अभंगस्वरुप) सत्सार भाग १ व २ (काव्यरचना), याशिवाय शिवरायांचा कुळवाडी भूषण हा पोवाडा (१८६९), हजरत महंमद पैगंबराचा दीर्घ पोवाडा सत्यशोधक समाजाचे रिपोर्ट्स, हंटर आयोगास दिलेले निवेदन मराठी ग्रंथकार सभेस पत्र, मामा परमानंदास पत्र, इत्यादी पुस्तकांचा व लिखाणांचा समावेश होतो.

अशा या महापुरुषाचा त्यांच्या कार्यामुळे ब्रिटीश सरकारने मोठा सत्कार करून जनतेने त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली तर आफ्रीकन नेता नेल्सन मंडेला यांनी जगातील पहिला महामानव महात्मा गांधी यांनी महात्मा फुलेंना खरा महात्मा संबोधून त्यांचा गौरव केला.

या थोर समाजक्रांतीकारक, विचारवंताचे दि. २८ नोव्हे. १८९० रोजी निधन झाले. शाश्वत नैतिक सत्याच्या आधारावर त्यांची विचारसरणी अधिष्ठित होती. त्यांना उच्चतर सामाजिक विकासाला कारणीभूत होणाऱ्या चिरंतर मूल्यांचा प्रत्यय आला होता. जोतीराव हे सत्यशोधक होते. म्हणूनं त्यांचे विचार आजही तेवढेच महत्वपूर्ण आहेत ते म्हणतात - आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने सर्व मानव स्त्रीपुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे. जो आपल्यापासून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेचे नुकसान देत नाही, अथवा जो कोणी आपल्यावरुन दुसऱ्या मानवाचे हक्क समजून इतरास पीडा देत नाही त्याला सत्य वर्तन करणारा म्हणतात. आपला सर्वांच्या निर्माण कर्त्यास संतोष देण्यासाठी केलेले वर्तन याला सार्वजनिक सत्य म्हणतात. जो कोणी इतर मानव बंधूबरोबर सत्य आचरण करील ती नीती म्हणतात, मग ती स्त्री असो, पुरुष असो, तो कोणीही मानव असो, सत्यशोधक समाजसेवक असो अथवा एखादा गावठेकर असो.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय - एक वाटचाल

'विद्या विनयेन शोभते': हे ब्रीदवाक्य जपण्याचा कायम प्रयत्न करणाऱ्या अस्मिता शिक्षण मंडळ संचालित व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचा गेल्या २२ वर्षातील एकंदर प्रवास लक्षात घेतला तर अनेक विद्यार्थ्यांना घडवितांना शैक्षणिक उंची बरोबरच मायेचा ओलावा, दयेचा पाझर, बंधुत्वाचा भाव, त्यागाची भावना तसेच आत्मिक समाधानाची एक मनस्वी जाणीव या सर्वांचाच विचार प्रामुख्याने केल्या गेला ह्याचे निश्चितच आत्मिक समाधान वाटत आहे.

महात्मा फुले यांनी जी सामाजिक समता, बंधुता व त्यागाची बिजे रुजविली त्याचा सदैव विचार मनामधे ठेवून तसे आचरण करण्याचा आम्ही सर्वच सदोदित प्रयत्न करीत असतो. म्हणूनच आमचा विद्यार्थी येथून बाहेर पडल्यावर कितीही मोठा झाला तरीही तो येथे मार्गदर्शनासाठी येतोच हे आमचे फलित होय. कर्तव्यतत्पर शिक्षक व अध्यापनाची ओढ या गोष्टींमुळेच हे साध्य झाले आहे. शिक्षकांसमवेत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही वेळोवेळी केलेल्या कार्यालयीन कामकाजातील योग्य मार्गदर्शनामुळे व आत्मियतेच्या वागणुकीमुळे परक्यांनाही आपलेसे करुन घेणारे हे आपले महाविद्यालय आहे, अशी आत्मियतेची भावना समाजामधे निर्माण झाली आहे.

आजपावेतो महाविद्यालयाचे सुमारे ३७ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत मेरीट आलेले आहेत. तसेच संगीत विषयाचे ९ विद्यार्थी यु. जी. सी. नेट परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. महाविद्यालयाच्या संगीत विभागाकरिता ही अभिमानास्पद बाब आहे. महाविद्यालयाच्या क्रीडा, सांस्कृतिक व रा.से.यो. विभागाचे कार्यही निश्चितच गौरवास्पद आहे.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक कुठल्याही सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमाकरिता तत्परतेने व आनंदाने तयार असते. रा.से.यो. स्वयंसेवक तसेच अमर कतोरे या एम. ए. भाग-२ च्या विद्यार्थ्याने तर आपल्या उत्कृष्ठ वक्तृत्वाव्दारे राष्ट्रीय सेवायोजनेच्या विविध कार्यक्रमातून अनेक विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याकरिता प्रेरित केले आहे. आदरणीय कमलताईंनी संगीतबध्द केलेले व संगीत विभागाने गायीलेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे विद्यापीठ गीत महाविद्यालयाकरिता निश्चितच गौरवास्पद बाब आहे. तसेच महाविद्यालयाच्या कस्तुरी या वार्षिकांकाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वार्षिकांक स्पर्धेमध्ये आतापर्यंत चार वेळा पुरस्कार प्राप्त झालेला आहे तर सत्र २०१८-१९ चा देखील पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

२०२२-२३ या सत्रात महाविद्यालयातील संगीत विषयाचे विद्यार्थी रोहन खंडारे व राहूल पवार यांची आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवाकरिता निवड झाली तसेच पी.जी. डिप्लोमा इन परफॉर्मिंग फोक आर्ट्स च्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विशेष प्राविण्य प्राप्त केले. आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात खो-खो मध्ये विशाल धोटे, यश हडाळे, कु. उर्वशी गुप्ता ह्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

२२ मार्च २0२0 पासून सुरु असलेल्या कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक क्षेत्रातही विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्वच अध्ययन-अध्यापन पद्धतीवर विपरित परिणाम झालेला आहे. पण या विपरित परिस्थितीतूनही आपण ऑनलाईन पद्धतीने शैक्षणिक कामकाज चांगल्या तऱ्हेने करायला लागलो ही जमेची बाजू म्हणावी लागेल. येणाऱ्या प्रत्येक संकटाला धीराने तोंड देण्यासाठी खंबीरपणे आपल्या पाठीशी कायम एखाद्या आधारवडासारखे उभे असणारे आपले संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री. मुरलीधरराव भोंडे सर ह्यांच्या मार्गदर्शनात शैक्षणिक कामकाज करतांना सामाजिक दृष्टिकोन जागृत ठेवून संस्थेचा व महाविद्यालयाचा लौकिक कायम ठेवू असा विश्वास व्यक्त करते. भव्य रक्तदान शिबिर, नेत्र चिकीत्सा शिबिर, योग शिबिर, उन्हाळी छंद शिबिर तसेच माजी विद्यार्थ्यांचा हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम समारोपीय सोहळ्यात घेण्यात आला, अस्मिता ह्या स्मरणिकेच्या निमित्ताने संस्थेशी जोडलेल्या सर्वच गणमान्य व्यक्तिंचे ऋणानुबंध दृढ होवून एक नवीन उभारी मिळाली.

**डॉ. मीनल ठाकरे (भोंडे)**
**प्राचार्य**

# अस्मिता शिक्षण मंडळ अमरावती द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय

## * माहिती पत्रक *

**१. महाविद्यालयीन शैक्षणिक वर्ष**

दिनांक ३ जुलै २०२३ सोमवार रोजी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ होईल.

**२. प्रवेश**

अ)स्नातक कला व समाज विज्ञान वर्गाच्या प्रवेशा संबंधी –

१) केंद्र व राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा व विद्यापीठाने मान्य केलेली तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्रिवर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षांसाठी प्रवेश दिला जाईल.

२) महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज पात्रता परीक्षेचा निकाल लागल्यापासून १० दिवसांच्या आत महाविद्यालयाच्या कार्यालयात पोहोचले पाहिजेत. १० दिवसांच्या कालावधीत कार्यालयात न पोहोचणारे प्रवेश अर्ज प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाहीत. म्हणून विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज सादर करतांनाच प्रवेशाच्या तारखेविषयी माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) विद्यापीठाच्या नियमानुसार ज्यांना सत्र सुरु ठेवण्याची परवानगी (ATKT) असेल किंवा जे महाविद्यालयीन विद्यार्थी प्रवेशपात्र परीक्षा आधीच उत्तीर्ण झाले असतील अशा विद्यार्थ्यांनी प्रवेशपात्र परीक्षेचा निकाल लागल्यापासून १० दिवसांच्या आत शुल्क भरुन प्रवेश घ्यावा अन्यथा ते आपल्या प्रवेशाचा हक्क गमावून बसतील.

४) परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना केवळ प्रयोगशाळेकरिता प्रवेश पाहिजे असल्यास, जागा असतील तर ऑगस्ट व जानेवारी महिन्यात प्राचार्य परवानगी देऊ शकतील. सत्राकरिता किंवा सत्राच्या काही कालावधीकरिता पदवी वर्गांना रु. ४४६/- शुल्क पडेल.

५) प्रवेश मिळविण्यासाठी माहितीपत्रास जोडलेल्या ठराविक नमुन्यातच अर्ज करावा लागेल. तो विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरातच असला पाहिजे व त्यावर माहितीपत्रकांच्या शर्थींना मान्यता देणारी विद्यार्थ्यांच्या वडिलांची, आईची किंवा पालकाची सही असावयास पाहिजे.

ब) प्रवेश अर्जासोबत पुढील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्य प्रतिलिपी जोडाव्यात (मूळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.)

१)अर्जदार यापूर्वी ज्या शाळा / महाविद्यालयात शिकत होता ती शाळा / महाविद्यालय सोडल्याचा अधिकृत दाखला.

२) अर्जदाराने शेवटची परीक्षा उत्तीर्ण केल्याचा स्पष्ट उल्लेख असलेला समाधानाकारक पुरावा. तसेच शिक्षणात खंड पडला असल्यास त्याकालावधीचे स्पष्टीकरणात्मक अधिकृत प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) दंडाधिकारी यांच्या समोर केलेले.

३) मागील परीक्षांमध्ये प्रत्येक विषयात मिळालेल्या गुणांचा स्पष्ट उल्लेख असलेली अधिकृत गुणपत्रिका.

४) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अथवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या व्यक्तिरिक्त अन्य विद्यापीठाचे वा मंडळाचे विद्यार्थी असल्यास स्थानांतरण प्रमाणपत्र. परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही स्थानांतरण प्रमाणपत्र आवश्यक राहील.

५) नामांकन आवेदनपत्र – नामांकनासाठी ठराविक नमुन्यातच आवेदनपत्र भरावे लागेल. नामांकन आवेदनपत्रासोबत नामांकन शुल्क व पात्रता, परीक्षेची मुळ गुणपत्रिका जोडावी लागेल. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे ह्यांची उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्या व्यक्तिरिक्त इतर मंडळाची / विद्यापीठाची पात्रता परीक्षा उत्तीर्ण होवून प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक उमेदवारास महाविद्यालयात प्रवेश न घेता बहिःशाल विद्यार्थी म्हणून परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवेश घेता असेल तर अशा विद्यार्थ्यालाही नामांकन आवेदनपत्र भरावे लागेल. नामांकन आवेदनपत्र ठरवून दिलेल्या मुदतीत भरले पाहिजे. मुदतीनंतर विलंब शुल्क आकारले जाईल.

६) जबाबदार नागरिकाचे चांगल्या वर्तणुकीबद्दलचे प्रमाणपत्र.

७) पासपोर्ट आकाराची छायाचित्रे

क) ठराविक नमुन्यात न केलेले, व्यवस्थित माहिती न भरलेले, आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्य प्रतिलिपी न जोडलेले व निकालापासून १० दिवसांचे आत कार्यालयात न पोहोचणारे अर्ज प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

ड) १) प्रवेश घेतेवेळी प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती दाखविणे आवश्यक राहील.

२) शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दुय्यम दाखला (Duplicate T.C.) असल्यास प्रवेश दिला जाणार नाही.

३) प्रवेशाच्या मुलाखतीसाठी येणारा प्रवास खर्च विद्यार्थांना स्वतःच करावा लागेल.

४) एकदा घेतलेल्या ऐच्छिक विषयात प्रवेश घेतल्यापासून तीस दिवसानंतर बदल करु दिल्या जाणार नाही. तसेच सत्राच्या प्रारंभी विद्यार्थ्याचे नांव ज्या तुकडीमध्ये समाविष्ट करण्यात आले असेल त्याच तुकडीमध्ये राहील. तुकडी बदलवून दिली जाणार नाही.

५) प्रवेशा संबंधीत कोणत्याही प्रश्नाबाबत प्राचार्याचा निर्णय अंतिम राहील.

इ) खालील कारणास्तव विद्यार्थ्याचे नांव महाविद्यालयाच्या पटावरुन काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

१) महाविद्यालयाच्या शुल्कांचा भरणा न करणे.

२) आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेस न पोहचणे.

३) प्राचार्यांच्या मतानुसार असमाधानकारक वर्तणूक असणे.

४) महाविद्यालयीन परीक्षांना न बसणाऱ्या व आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेस न पोहोचणाऱ्या किंवा प्रत्येक विषयात कमीत कमी ७५ टक्के व्याख्यानांना हजर न राहणाऱ्या विद्यार्थांना वर्षा अखेरीस विद्यापीठाच्या परीक्षेस बसू दिले जाणार नाही. तसेच शारीरिक शिक्षणाच्या तासापैकी ८० टक्के तासांना हजर न राहिल्यास विद्यार्थ्यांना वर्षाअखेरीस विद्यापीठाच्या परीक्षेस बसू दिले जाणार नाही व त्यास महाविद्यालयाच्या पटावरुन कमी केले जाईल.

ई) विद्यापीठ परीक्षेचे आवेदनपत्र नेमून दिलेल्या तारखेच्या आत विद्यार्थ्याने भरणे ही सर्वस्वी विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील. दिलेल्या तारखेच्या आत आवेदनपत्र न भरल्यास, त्या तारखेनंतर ते भरण्याची कुठल्याही परिस्थितीत परवानगी देण्यात येणार नाही.

उ) प्रत्येक वर्गासाठी राखीव जागा खालीलप्रमाणे राहतील.

| | |
|---|---|
| १)अनुसुचित जाती व अनुसूचित जातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती. | १३ टक्के |
| २)अनुसुचित जमाती | ७ टक्के |
| ३)विमुक्त जाती ( १४ तत्सम जाती) | ३ टक्के |
| ४)भटक्या जमाती (जाने. १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५ टक्के |
| ५)भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती | ३.५ टक्के |
| ६)भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| ७)इतर मागासवर्गीयांकरिता (ओ.बी.सी.) | १९ टक्के |

टीपः उपरिनिर्दिष्ट ५, ६ व ७ मधील उन्नत गट वगळून शां. नि. क्र. सी.बी.सी. १०९४ प्र. क्र. ८६ मा.व. क. ५. दि. १६ जून १९९४ (व. शा. नि. क्र. बी. सी. सी.१०१४-३६०९ प्र. क्र. ५६-९४-१६ व दिनांक १५ फेब्रुवारी १९९६) प्रमाणे आरक्षण दिले जाईल. शासन निर्णय बदलल्यास त्यानुसार आरक्षणात बदल होईल.

८) महाविद्यालयातील उपलब्ध जागांच्या पाच टक्के जागा क्रीडा, वक्तृत्व, वादविवाद इत्यादितील नैपुण्य लक्षात घेऊन भरण्याचा विशेषाधिकार प्राचार्यांना राहील.

**३ शुल्क**

१) विद्यार्थास महाविद्यालयात प्रवेश कोणत्याही तारखेस मिळालेला असला किंवा त्याने / तिने महाविद्यालय कोणत्याही तारखेस सोडले तरी त्याला / दिला संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी शिक्षण शुल्क द्यावे लागेल.एखाद्या विद्यार्थ्यांला काही कारणाने महाविद्यालय सोडावयाचे असेल तर तसेच खास कारण असल्याशिवाय शुल्कात (शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क) सवलत मिळणार नाही. मात्र या राज्यातील अन्य महाविद्यालयात अथवा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शिक्षण विभागातून सत्राच्या मध्येच महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांना अन्य महाविद्यालयाच्या पटावर त्याचे नांव असे पर्यंतच्या कालावधीचे शिक्षण शुल्क द्यावे द्यावे लागणार नाही.

२) शिक्षण शुल्क दोन हप्त्यात भरले पाहिजे. महाविद्यालयाच्या शिक्षण शुल्कांचा पहिला हप्ता प्रवेश मिळाल्यावर ताबडतोब भरावा लागेल व दुसरा हप्ता पंधरा डिसेंबरपर्यंत भरला पाहिजे. त्या तारखेनंतर मात्र विलंब झालेल्या प्रत्येक दिवशी शिक्षण शुल्कावर १ रु. दंड आकारला जाईल.

डिसेंबर अखेरपर्यंत शुल्क भरले नाही तर विद्यार्थ्यांचे नांव महाविद्यालयाच्यापटावरुन काढून टाकण्यात आले आहे, असे मानण्यात येईल व दंडासह बाकी रुक्कम रुपये पाच पुनः प्रवेशाचे शुल्क भरल्याशिवाय त्याला / तिला प्रवेश मिळणार नाही.विशेष कारणाशिवाय दंड आकारण्यात सूट दिली जाणार नाही.

टिपः डिसेंबर महिन्याची पंधरा तारीख रविवारी किंवा अन्य सुटीच्या दिवशी येत असेल तर विद्यार्थ्यांनी त्यापूर्वीच्या कामाच्या दिवशी शुल्क भरावे.

३)शुल्काचे दरः विद्यापीठाने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्काचे दर राहतील मात्र या दरात विद्यापीठाने वेळोवेळी केलेली वाढ विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

- शुल्क आकारणी तक्ता -

(पदवी व पारंगत विद्यार्थ्यांसाठी)

| | | |
|---|---|---|
| (अ) | | रुपये. पैसे |
| १) शिक्षण शुल्क (कला आणि समाज विज्ञान) (पूर्ण वर्षाकरिता) | - | ८००. ०० |
| अ) पहिला हप्ता प्रवेशाचे वेळी भरावा लागेल. | - | ४००.०० |

| | | |
|---|---|---|
| बी. ए. (वाङ्मय स्नातक) | - | सहपत्र अ |
| बी. कॉम. (वाणिज्य स्नातक) | - | सहपत्र ब |
| बी.सी.ए. (विज्ञान स्नातक) | - | सहपत्र क |
| एम. ए. (वाङ्मय पारंगत) | - | सहपत्र ड |

शिक्षण शुल्काचा पहिला हप्ता व सुरक्षाधन, संकलित निधीची वर्गणी इत्यादी सर्व रकमा प्रवेश मिळाल्यावर ताबडतोब महाविद्यालयाच्या कार्यालयात भरल्या पाहिजेत.

**७) कार्यालयात पुढील रीतीने शुल्क भरता येईल -**

अ) महाविद्यालयाच्या कार्यालयातून मिळणाऱ्या भरणापत्रात सुवाच्य हस्ताक्षरात पूर्ण तपशील भरुन ते लेखापालाकडे द्यावे. लेखापाल आवश्यक त्या नोंदी करुन सही करतील व छापील पावती देतील. विद्यार्थ्यांनी ती काळजीपूर्वक जतन करुन ठेवली पाहिजे. मूळ शुल्क पावती हरवल्यास व त्याबाबतचे प्रमापपत्र पाहिजे असल्यास त्यासाठी कार्यालयास रुपये पंचवीस (रु. २५.००) भरावे लागतील.

ब) महाविद्यालयात प्रवेश झाल्यानतंर प्रत्येक विद्यार्थ्यांने कार्यालयातून आपले ओळखपत्र तयार करुन घेणे अनिवार्य आहे. आपण ओळखपत्र हरवले तर नवीन ओळखपत्र मिळविण्याकरिता रुपये दहा आकारले जातील.

**८) शिक्षण शुल्क परत करण्यासंबंधीचे नियम-**

या महाविद्यालयात प्रवेश मिळालेले विद्यार्थी जर कृषी, स्थापत्य, वैद्यकीय (ज्यात दंतशास्त्र व आयुर्वेद यांचा समावेश आहे) शिक्षणपदविका व इतर तत्सम व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालय सोडून जातील तर त्यांनी भरलेले संपूर्ण शिक्षण शुल्क त्यांना परत मिळू शकेल मात्र-

अ) प्रवेशाकरिता अर्ज करतेवेळी आपण एक वा अनेक व्यावसायिक महाविद्यालयाकडे अर्ज केले आहेत किंवा एक अथवा अनेक व्यावसायिक महाविद्यालयाकडे अर्ज करण्याची आपली इच्छा आहे असे त्याने कळविले पाहिजे ; तसेच

ब) व्यावसायिक महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून पहिल्या पंधरवाड्याच्या आत महाविद्यालयातून शिक्षण शुल्क परत घ्यावयाचे असेल तर, प्राचार्यांकडे पूर्वी भरलेले शुल्क परत मिळविण्यासाठी लेखी अर्ज केला पाहिजे. प्रत्यक्ष ज्या व्यावसायिक महाविद्यालयात विद्यार्थ्याने प्रवेश घेतला असेल तेथे प्रवेशाकरिता केलेल्या अर्जाच्या तारखेचा व प्रवेश मिळाल्याच्या तारखेचा निर्देश असलेले त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे प्रमापपत्र हे शुल्क परत मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जासोबत पाठविणे जरुर आहे.

४. सवलती व विद्यावेतने

महाविद्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्या, शिष्यवृत्या आणि विद्यावेतने यासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधून मुदतीच्या आत आपली आवेदनपत्रे सादर करणे आवश्यक आहे. याकरिता कार्यालयाद्वारे वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांकडे त्यांची लक्ष ठेवावे.

मुदतीत अर्ज सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पात्रताप्राप्त विद्यार्थ्यांचीच राहील. आवेदन पत्राशिवाय अधिछात्रवृत्ती / शिष्यवृत्ती / विद्यावेतन दिले जाणार नाही.

१) शिक्षण शुल्क माफी– ज्या विद्यार्थ्यांचे स्वतःचे, त्यांच्या माता– पित्यांचे किंवा शिक्षण व पोषण याकरिता ज्या कोणावर ते अवलंबून असतील त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न (प्रवेशपूर्व वित्तीय वर्षाचे) रु. ८,००,००० हून अधिक नसेल त्यांना शासनातर्फे राजश्री छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शुल्क माफी दिली जाते. या सवलतीकरिता प्रत्येक तिमाहीत हजेरीचे प्रमाण ७५ टक्क्याहून कमी नसले पाहिजे. जर त्यांची उपस्थिती ७५ टक्क्याहून कमी असेल तर हजेरीचे प्रमाण कमी असलेल्या त्या विशिष्ट तिमाहीकरिता त्याला पूर्ण शुल्क द्यावे लागेल. विद्यार्थ्यांनी प्राचार्यांकडे ऑनलाईन अर्ज भरुन त्याची प्रत आवश्यक दस्ताऐवजासह महाविद्यालय सुरु झाल्यापासून किंवा प्रवेश घेतलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत वा ३१ जुलैपूर्वी भरुन महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे. अर्जदाराने ठराविक नमुन्यात नोंद केलेल्या पालकाच्या उत्पनाच्या प्रतिज्ञापत्राची प्रत अर्जासोबत जोडली पाहिजेत. याखेरीज विद्यार्थ्यांने राजपत्रित अधिकारी अथवा इतर महसूल अधिकारी यांची सही असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र दिले पाहिजे.

टीप : वेळोवेळी शासनाकडून येणाऱ्या आदेशाप्रमाणे या व इतर सवलती देण्यात येतील.

२) शिष्यवृत्ती

अ) मेरीट शिष्यवृत्ती – शेकडा ७५ टक्केचे वर गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना मेरीट बेसीसवर स्कॉलरशिप मिळूशकते. प्रवेश घेतल्यापासून एक महिन्याच्या आत अर्ज करावेत.

ब) अपंग शिष्यवृत्ती – प्रत्येक अपंग विद्यार्थ्याला अपंग शिष्यवृत्ती मिळू शकते. यासाठी अपंग असल्याबद्दल त्याना सिव्हील सर्जन यांचा दाखला आवश्यक आहे.

क) प्राथमिक शाळा शिक्षकांच्या मुलांना मेरीट स्कॉलरशिप- प्राथमिक शाळा शिक्षकांच्या ज्या मुलांना परिक्षेत ६० टक्क्यापेक्षा अधिक गुण मिळाले त्यांना ही शिष्यवृत्ती मिळू शकते. परीक्षेचा निकाल लागल्यापासून ३० दिवसाचे आंत यासाठी अर्ज करावा लागतो.

ड) स्वातंत्र संग्राम सैनिकाचे मुलांना शिष्यवृत्ती – या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख प्रवेश घेतल्यापासून ३० दिवसाचे आत असते. सोबत सन्मानपत्र आवश्यक आहे.

टीपः १) एक व्यावसायिक अभ्यासक्रम पुर्ण करुन दुसरा व्यावसायिक अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. (उदा. बी.एड. झाल्यानंतर लॉ घेणारे विद्यार्थी)

२) वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.

३) समान अभ्यासक्रमाला पुन्हा शिष्यवृत्ती मिळणार नाही.

४) एका पालकाच्या फक्त दोन मुलांना शिष्यवृत्ती मिळू शकते ही अट मुलीच्या बाबतीत शिथील करण्यात आली आहे.

**३) शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची पद्धत-**

सर्व मागासवर्गाच्या व कमी उत्पनाच्या वर्गात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालया मार्फत प्रवेशापासून दहा दिवसांच्या आत अर्ज करावेत. अर्ज सर्व दृष्टीने पूर्ण असावा. खोटी माहिती दिल्यास त्या विद्यार्थ्यांस शिष्य वृत्तीसाठी अपात्र ठरविले जाईल. ज्यांच्या शिक्षणात खंड पडला असेल त्यांनी त्या काळात तो काय करीत होता या संबंधी न्यायालयासमक्ष केलेले प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

शिष्यवृत्ती फॉर्म भरतेवेळी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे खाते उघडणे आवश्यक आहे.जर, विद्यार्थ्यांनी आधीच खाते उघडले असल्यास तोच खाते क्रमांक टाकून जपश्रळपश शिष्यवृत्ती फॉर्म भरता येतो. जपश्रळपश फॉर्म विद्यार्थ्यांनीच भरुन त्याची प्रिंटआऊट प्रत प्रमाणपत्राच्या आवश्यक सत्यप्रतीसह फोटो सहित महाविद्यालयात जमा करावी.

अनुसूचित जातीजमाती, भटक्या जाती जमाती आदींना त्यांच्या उत्पनाच्या आधारावर शिष्यवृत्ती मिळते. भारत सरकारच्या शिष्यवृत्तीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक शुल्क भरण्याची गरज नाही.

## ५. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अध्यादेश विद्यार्थ्यांच्या माहिती व मार्गदर्शनाकरिता सूचना :

* महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतांना विद्यापीठाचे अध्यादेश, नियम व परिनियमाची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. विशेषत: प्रवेशाकरिता खालील अध्यादेशातील तरतूदी नीट समजून घेणे / माहिती असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयाचे नियम, आदेश व शिस्त पालन करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| अध्यादेश क्रमांक १. | विद्यार्थ्यांचे नामांकनासंबंधी |
| अध्यादेश क्रमांक २. | विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत |
| अध्यादेश क्रमांक ३. | राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये सहभागी होणे बाबत. |
| अध्यादेश क्रमांक ५. | विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य कल्याण क्रीडा |
| अध्यादेश क्रमांक १०. | सूट, सवलत आणि पुढील वर्गात प्रवेश मिळणे बाबत. |
| अध्यादेश क्रमांक १२. | विद्यापीठ शुल्क संबंधी माहिती. |
| अध्यादेश क्रमांक १९. | पदवी करिता विद्यार्थ्यांचा प्रवेश |
| अध्यादेश क्रमांक १०९. | विद्यापीठाच्या दस्तावेजामध्ये नांव बदलविण्यासंबंधी |
| अध्यादेश क्रमांक १/८५. | प्रोत्साहनात्मक गुणासंबंधित |
| अध्यादेश क्रमांक १८. | Grace Marks |
| अध्यादेश क्रमांक ३२. | एन.एस.एस.(राष्ट्रीय सेवा योजना) |

टीप: वरील अध्यादेशांच्या प्रती विद्यार्थ्यांना संदर्भासाठी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध राहील.

## Consultancy Services

1) Yoga & Meditation - Dr. S. R. Dhakulkar
2) Counseling for students & Parents - Dr. G. R. Ratnaparkhi
3) English Communication Skills, Spoken & Writing- Dr. J. K. Bawane / Prof. Ambika R. Badnakhe
4) Computer awareness for students & Faculty - Prof. Sonali Barad

## Earn and Learn Scheme (कमवा आणि शिका)

१) संगणकाचे विशेष ज्ञान असणा-या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका या योजनेअंतर्गत कामाच्या स्वरुपात मोबदला.

# वाङ्मय स्नातक

## त्रि- वर्षीय पाठ्यक्रम

## (शिक्षणाचे माध्यम - मराठी, हिंदी, इंग्रजी)

टीप : वैकल्पिक विषयांकरिता / माध्यमांसाठी शासनाने त्रिवर्षीय पदवी वर्गासाठी किमान विद्यार्थी संख्या २४ निर्धारित केली आहे. म्हणून ज्या विषयाच्या इंग्रजी वा हिंदी माध्यमाच्या वर्गात विद्यार्थीसंख्या २४ पेक्षा कमी असेल तो विषय विद्यार्थ्यांना बदलून घ्यावा लागेल. कला आणि समाजविज्ञान विद्याशाखेतील विद्यापीठाने ठरवून दिलेल्या विषयांच्या जेवढ्या गटांची सोय महाविद्यालयाच्या वेळापत्रकात करण्यात आली आहे तेच गट विद्यार्थ्यांना घेता येतील.

१) आवश्यक भाषा इंग्रजी

२) पुढील भाषांपैकी कोणतीही एक भाषा आवश्यक –
मराठी किंवा हिंदी किंवा संस्कृत किंवा उर्दू

३) पुढील कोणतेही तीन ऐच्छिक विषय
१)राज्यशास्त्र किंवा संगीत
२)भूगोल किंवा संस्कृत वाङ्मय
३)समाजशास्त्र किंवा मानसशास्त्र
४)मराठी वाङ्मय किंवा हिंदी वाङ्मय किंवा इंग्रजी वाङ्मय किंवा उर्दु वाङ्मय

टीपः विद्यार्थ्यांना वरीलपैकी दोनपेक्षा जास्त वाङ्मय विषयाची तसेच दोनपेक्षा जास्त प्रात्यक्षिक विषयाची निवड करता येणार नाही.

## एम.ए.भाग १ (भारतीय संगीत) सेमीस्टर - १

| | | प्रात्यक्षिक | अंतर्गत गुण |
|---|---|---|---|
| १) | प्रात्यक्षिक परीक्षा ( Viva) | ८० | २० |
| २) | सभागायन (Stage Performance) | ८० | २० |
| | | थेअरी | अंतर्गत गुण |
| ३) | संगीताचे क्रियात्मक शास्त्र आणि सांगीतिक रचना | ८० | २० |
| ४) | संगीताचे शास्त्र व प्राचीन ग्रंथकारांचा अभ्यास | ८० | २० |

## एम.ए.भाग १ (भारतीय संगीत) सेमीस्टर - २

| | | प्रात्यक्षिक | अंतर्गत गुण |
|---|---|---|---|
| १) | प्रात्यक्षिक परीक्षा ( Viva) | ८० | २० |
| २) | सभागायन (Stage Performance) | ८० | २० |
| | | थेअरी | अंतर्गत गुण |
| ३) | संगीताचे क्रियात्मक शास्त्र आणि सांगीतिक रचना | ८० | २० |
| ४) | मध्यकालीन भारतीय संगीताचा इतिहास व शास्त्र | ८० | २० |

## एम.ए.भाग २ (भारतीय संगीत) सेमीस्टर - ३

| | | प्रात्यक्षिक | अंतर्गत गुण |
|---|---|---|---|
| १) | प्रात्यक्षिक परीक्षा (Viva) | ८० | २० |
| २) | सभागायन (Stage Performance) | ८० | २० |
| | | थेअरी | अंतर्गत गुण |
| ३) | शास्त्रीय संगीताचे क्रियात्मक सिद्धांत | ८० | २० |
| ४) | आधुनिक भारतीय संगीताचा इतिहास व शास्त्र | ८० | २० |

## एम.ए.भाग २ (भारतीय संगीत) सेमीस्टर - ४

| | | प्रात्यक्षिक | अंतर्गत गुण |
|---|---|---|---|
| १) | प्रात्यक्षिक परीक्षा (Viva) | ८० | २० |
| २) | सभागायन (Stage Performance) | ८० | २० |
| | | थेअरी | अंतर्गत गुण |
| ३) | शास्त्रीय संगीताचे क्रियात्मक सिद्धांत | ८० | २० |
| ४) | सौंदर्यशास्त्र आणि संशोधन पद्धती | ८० | २० |

## M.A. Psychology and Counselling

| Semester I | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) Advance general Psychology | 80 | 20 |
| 2) Fundamental of Research and Statistical Method | 80 | 20 |
| 3) Personality Psychology | 80 | 20 |
| 4) Neuro-Bio Psychology-I | 80 | 20 |
| 5) Practical (Experiments) | 80 | 20 |

| Semester II | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) Cognitive Psychology | 80 | 20 |
| 2) Advance research and statistical method | 80 | 20 |
| 3) Psychological testing | 80 | 20 |
| 4) Neuro - Bio Psychology II | 80 | 20 |
| 5) Practical (Testing) | 80 | 20 |

## M.A. Political Science

| Semester I | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) Indian Political Thought | 80 | 20 |
| 2) Indian Govt and Politics | 80 | 20 |
| 3) Public Administration | 80 | 20 |
| 4) International Relations | 80 | 20 |

| Semester II | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) State Politics in India | 80 | 20 |
| 2) Governance and Public Policy in India | 80 | 20 |
| 3) Major Issues in contemporary world Politics | 80 | 20 |
| 4) Political Process in India | 80 | 20 |

# M.A. Sociology

| Semester I | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) Paper I - Classical Sociological Thinkers | 80 | 20 |
| 2) Paper II - Methodology of Social Research | 80 | 20 |
| 3) Paper III - **Core Elective One Paper** | 80 | 20 |
| A) Perspectives of Indian Society | | |
| B) Rural Society In India | | |
| 4) Paper IV - **Core Elective One Paper** | 80 | 20 |
| A) Sociology of Religion | | |
| B) Social Movements in India | | |

| Semester II | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) Paper I - Classical Sociological Thinkers | 80 | 20 |
| 2) Paper II - Methodology of Social Research | 80 | 20 |
| 3) Paper III - **Core Elective One Paper** | 80 | 20 |
| A) Health and Society | | |
| B) Urban Society in India | | |
| 4) Paper IV - **Core Elective One Paper** | 80 | 20 |
| A) Cultural Anthropology & Tribal Studies | | |
| B) Social Movements in India | | |

| Semester III | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) Paper I - Theoretical Perspectives in Sociology | 80 | 20 |
| 2) Paper II - Sociology of Change & Development | 80 | 20 |
| 3) Paper III - **Core Elective One Paper**<br>A) Industry and Society in India<br>B) Political Sociology | 80 | 20 |
| 4) Paper IV - **Core Elective One Paper**<br>A) Crime & Society in India<br>B) Gender & Society | 80 | 20 |

| Semester IV | Theory | Internal |
|---|---|---|
| 1) Paper I - Theoretical Perspectives in Sociology | 80 | 20 |
| 2) Paper II - Sociology of Change & Development | 80 | 20 |
| 3) Paper III - **Core Elective One Paper**<br>A) Indian Sociological Tradition<br>B) Social Psychology | 80 | 20 |
| 4) Paper IV - **Core Elective One Paper**<br>A) Crime & Society in India<br>B) Gender & Society<br>C) Dissertation / Research Project Report. | 80 | 20 |

## वाणिज्य स्नातक भाग -१

# B.Com. Part-I Examination

## Semester - I

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| English | 80 | 20 | 100 |
| Marathi | 80 | 20 | 100 |
| Hindi | 80 | 20 | 100 |
| P. ECo. | 80 | 20 | 100 |
| Adv. Accountancy | 80 | 20 | 100 |
| PBO | 80 | 20 | 100 |
| CFS-I | 60 | 40 | 100 |

## Semester - II

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| English | 80 | 20 | 100 |
| Marathi | 80 | 20 | 100 |
| Hindi | 80 | 20 | 100 |
| PBM | 80 | 20 | 100 |
| Financial Accountancy | 80 | 20 | 100 |
| BE co. | 80 | 20 | 100 |
| CFS-II | 60 | 40 | 100 |

# B. Com. Part-II Examination

## Semester - III

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| English | 40 | 10 | 50 |
| Marathi | 40 | 10 | 50 |
| Hindi | 40 | 10 | 50 |
| Company A/c | 80 | 20 | 100 |
| Business Mathematics | 80 | 20 | 100 |
| Auditing | 80 | 20 | 100 |
| Monetary system | 80 | 20 | 100 |
| ITBDP-I | 60 | 40 | 100 |

## Semester - IV

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| English | 40 | 10 | 50 |
| Marathi | 40 | 10 | 50 |
| Hindi | 40 | 10 | 50 |
| Corporate Accounting | 80 | 20 | 100 |
| Business statistics | 80 | 20 | 100 |
| Income Tax | 80 | 20 | 100 |
| Indian Financial System | 80 | 20 | 100 |
| ITBDP-II | 60 | 40 | 100 |
| EVS | 100 | - | 100 |

## Semester - V

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| English | 40 | 10 | 50 |
| Marathi | 40 | 10 | 50 |
| Hindi | 40 | 10 | 50 |
| Cost Accounting | 80 | 20 | 100 |
| Business Regulatory Framework | 80 | 20 | 100 |
| Business Environment | 80 | 20 | 100 |
| E-Commerce - I | 60 | 40 | 100 |
| Internet & WWW - I | 60 | 40 | 100 |

## Semester - VI

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| English | 40 | 10 | 50 |
| Marathi | 40 | 10 | 50 |
| Hindi | 40 | 10 | 50 |
| Management Accounting | 80 | 20 | 100 |
| Economics of Development | 80 | 20 | 100 |
| Company Law | 80 | 20 | 100 |
| E-Commerce - II | 60 | 40 | 100 |
| Internet & WWW - II | 60 | 40 | 100 |

# M.Com. Part - I Examination

## Semester - I

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| 1) Managerial Economics | 80 | 20 | 100 |
| 2) Service marketing and Customer Relation Management | 80 | 20 | 100 |
| 3) Advance Financial and cost accounting | 80 | 20 | 100 |
| 4) Banking and Insurance Service | 80 | 20 | 100 |

## Semester - II

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| 1) Accounting for Managerial Decision | 80 | 20 | 100 |
| 2) Strategic Management | 80 | 20 | 100 |
| 3) Management concepts and Behavior | 80 | 20 | 100 |
| 4) Computer application in business | 80 | 20 | 100 |

# M.Com. Part - II Examination

## Semester - III

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| 1) Research Methodology | 80 | 20 | 100 |
| 2) Statiscal analysis | 80 | 20 | 100 |
| 3) Corporate Tax Planning & Management | 80 | 20 | 100 |
| 4) E-Commerce & Legal Security | 80 | 20 | 100 |

## Semester - IV

| Subject | Theory | Int./Pract. | Total Marks |
|---|---|---|---|
| 1) Entrepreneurship and skill Development | 80 | 20 | 100 |
| 2) Financial institution and market / states and distribution management / International business environment | 80 | 20 | 100 |
| 3) Saving and Investment Planning / co-operation management / International Marketing | 80 | 20 | 100 |
| 4) Security analysis and Portfolio management / International financing / foreign trade policy procedures and documentation | 80 | 20 | 100 |

# Bachelor of Computer Application (BCA)

## BCA Part - I (Semester-I)

| Subject | Theory | Prac./Int. | Total |
|---|---|---|---|
| Communication Skill | 40 | 10 | 50 |
| Communication Skill in English | 00 | 25 | 25 |
| Fundamentals of Computers | 80 | 20 | 100 |
| Structured Prog. Paradigms | 80 | 20 | 100 |
| Data Structure | 80 | 20 | 100 |
| Fundamentals of Elect. in Computer | 80 | 20 | 100 |
| Computer H/W S/W Troubleshooting | 00 | 50 | 50 |
| Data Structure | 00 | 50 | 50 |
| Fundamentals of Comp. Elect. | 00 | 50 | 50 |
| Elective I(CFS /IT and BDP) | 50 | 00 | 50 |

## BCA Part - I (Semester-II)

| Subject | Theory | Prac./Int. | Total |
|---|---|---|---|
| Communication Skill | 40 | 10 | 50 |
| Communication Skill in English | 00 | 25 | 25 |
| Computer System and Interface | 80 | 20 | 100 |
| Data Base Management System | 80 | 20 | 100 |
| Object Oriented Programming | 80 | 20 | 100 |
| Fundamentals of Computational Maths | 80 | 20 | 100 |
| Computer Interfacing | 00 | 50 | 50 |
| DBMS | 00 | 50 | 50 |
| CPP | 00 | 50 | 50 |
| Elective I(Fund. of C Prog./e-Com.) | 50 | 00 | 50 |

## BCA Part - II (Semester-III)

| Subject | Theory | Theory | Theory |
|---|---|---|---|
| Operating System | 80 | 20 | 100 |
| Core Java Programming | 80 | 20 | 100 |
| Fundamentals of Open Source S/W | 80 | 20 | 100 |
| Python Programming | 80 | 20 | 100 |
| Operating System | 00 | 50 | 50 |
| Java Programming | 00 | 50 | 50 |
| Python Programming | 00 | 50 | 50 |

# Bachelor of Computer Application (BCA)

## BCA Part - II (Semester-IV)

| Subject | Theory | Prac./Int. | Total |
|---|---|---|---|
| Communication Network | 80 | 20 | 100 |
| Web Technologies | 80 | 20 | 100 |
| Advance Java Programming | 80 | 20 | 100 |
| Fundamentals of Data Science | 80 | 20 | 100 |
| Web Technologies | 00 | 50 | 50 |
| Advance Java Programming | 00 | 50 | 50 |
| Data Science using Python | 00 | 50 | 50 |
| Environmental Studies | 70 | 30 | 100 |

## BCA Part - III (Semester-V)

| Subject | Theory | Prac./Int. | Total |
|---|---|---|---|
| Computer Graphics | 80 | 20 | 100 |
| Android Application Development | 80 | 20 | 100 |
| Dot Net Technologies with C# | 80 | 20 | 100 |
| Software Engineering | 80 | 20 | 100 |
| Graphic Programming | 00 | 50 | 50 |
| Android Prpgramming | 00 | 50 | 50 |
| C# Programming | 00 | 50 | 50 |
| Elective I (Block chain Technology/ Cyber Security/Power BI) | 50 | 00 | 50 |

## BCA Part - III (Semester-VI)

| Subject | Theory | Prac./Int. | Total |
|---|---|---|---|
| R-Programming | 80 | 20 | 100 |
| PHP programming | 80 | 20 | 100 |
| Fundamentals of Cloud Computing | 80 | 20 | 100 |
| Network Security | 80 | 20 | 100 |
| R Programming | 00 | 50 | 50 |
| PHP Programming | 00 | 50 | 50 |
| Based on Cloud Computing | 00 | 50 | 50 |
| Internship / Project | 00 | 50 | 50 |

## Master of Science (Computer Science)
## Part - I (Semester I)

**A) Core Subject**

1) 1MCS1 - 1 Computer System Design
2) 1MCS2 - Data Structure with OOP
3) 1MCS3 - 3 Data Base Management Technologies
4) 1MCS4 - 4 Computer Network & Wireless Technology

**B) Skill - 1**

1) 1MCS5 - 4- Advanced Java / Ns2/ tools

**C) Elective - 1**

1) 1MCS6(1) - (1) Discrete Mathematical Structure
2) 1MCS6(2) - (2) Entrepreneurship Development
3) 1MCS6(3) - (3) Research Methodology
4) 1MCS6(4) - (4) Management Information Systemt
5) 1MCS6(5) - (5) Data Science and Analytics

**D) Laboratories**

1) 1MCS7 1,2 - Programming (C/C++/ Java/ ALP)
2) 1MCS8 3-SQL/ DBMS tools, Mssql, My Sql

## (Semester I)

**A) Core Subject**

1) 2MCS1 - 1 Operating System Algorithms
2) 2MCS2 - 2 Graphics Application Programming
3) 2MCS3 - 3 Software Engineering
4) 2MCS4 - 4 Data Mining and Data Warehousing

**B) Skill - 1**

1) 2MCS5 - 4 - 1 - OS (Windows / Android / Linux)

**C) Elective - 1**

1) 2MCS6(1) - (1) Theory of Computation
2) 2MCS6(2) - (2) Computer System Architecture
3) 2MCS6(3) - (3) Enterprise Resource Management
4) 2MCS6(4) - (4) Mobile Computing
5) 2MCS6(5) - (5) Compiler Construction

**D) Laboratories**

1) 2MCS7 - 3,4 - SE tools / DM tools
2) 2MCS8 3 - 2 - Graphics programming and tools

# Master of Science (Computer Science)
## Part - II (Semester III)

**A) Core Subject**

1) 3MCS1 - 1 Algorithms and Design
2) 3MCS3 - 2 Web Computing
3) 3MCS4 - 3 Artificial Intelligence and Machine Learning
4) 3MCS4 - 4 Distributed Computing

**B) Skill - 1**

1) 3MCS5 - 1 Programming on algorithms and Design

**C) Elective - 1**

1) 3MCS6(1) - (1) Optimization Techniques
2) 3MCS6(2) - (2) Digital Forensics
3) 3MCS6(3) - (3) Software Project Management
4) 3MCS6(4) - (4) E-Commerce
5) 3MCS6(5) - (5) Network Security

**D) Laboratories**

1) 3MCS7 - 2 HTM / JS / CSS/ .net / PHP
2) 3MCS8 3 - 3AL Programming. Tools / Python

## Part - II (Semester IV)

**A) Core Subject**

1) 4MCS1 - 1 Cloud Computing
2) 4MCS3 - 2 Big Data
3) 4MCS4 - 3 ES, Internet of Things (IOT)
4) 4MCS4 - 4 Block Chain Technology

**B) Skill - 1**

1) 4MCS5 - Android Programming

**C) Elective - 1**

1) 4MCS6(1) - (1) Parallel Computing
2) 4MCS6(2) - (2) Image Processing
3) 4MCS6(3) - (3) Cyber Security
4) 4MCS6(4) - (4) OOSE
5) 4MCS6(5) - (5) Robotics & AI

**D) Laboratories**

1) 4MCS7 - 3,4 - Block Chain / IoT tools
2) 4MCS8 - 1, - Cloud Computing and Big Data
3) 4MCS9 - Seminar
4) 4MCS10 - Project

## One Year P.G. Diploma Course in Performing Folk Art

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | क्रियात्मक मौखिक ( Viva) | - | ८० | २० |
| २) | मंच प्रदर्शन (Stage Performance) | - | ८० | २० |
| ३) | लोककला व लोकनाट्याचा अभ्यास | - | ८० | २० |
| ४) | लोककला प्रकारातील घटक आणि सामुहिक व वैयक्तिक लोककला प्रकार | - | ८० | २० |

## PG Diploma in Financial Literacy

## PG Diploma in Cyber Security

# करिअर कट्टा

करिअर कट्टा हा उपक्रम महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी हा केद्रबिंदु मानुन तयार करण्यात आलेला आहे. आपले पदवीचे शिक्षण पूर्ण करीत असतांना विद्यार्थ्यांच्या दारी नोकरी किंवा व्यवसाय अभिक्षमता विकसित व्हाव्यात या उद्देशाने करीयर कट्टा हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्र भर सातत्याने कार्य करीत आहे.

करीयर कट्टा अंतर्गत विशेष दोन उपक्रम राबवले जातात.

१) आय.ए.एस. आपल्या भेटीला – यामध्ये महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व अत्यंत माफक दरात तज्ञ व अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाते. यामध्ये आय. ए. एस, आय.पि.एस., एम.पी.एस.सी. अधिकारी अशा ५२ तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार असून संबंधित विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध असणार आहेत.

२) उद्योजक आपल्या भेटीला या – या अंतर्गत युवकांचा उद्योगामध्ये सहभाग वाढावा या दृष्टीने व्यवसाय करण्यास आवश्यक ते सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्याकरिता वर्षभरातून ५२ प्राविण्य व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

वरीर सर्व सुविधा केवळ ३६५ रु. भरुन प्राप्त होणार असून त्यामध्येच शासनाच्या ५० विविध व्यावसायिक अभ्यासक्रमातुन प्रतिवर्षी ५ असे एकूण १५ अभ्यासक्र पदवी स्तरावरच विद्यार्थी मोफत करु शकणार आहेत.

तेव्हा विद्यार्थ्यांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाद्वारे करण्यात येत आहे.

### ७. ग्रंथालय

१) महाविद्यालयाचे ग्रंथालय सर्व विषयातील ग्रंथांनी समृद्ध असून दरवर्षी त्यात नवीन ग्रंथाची भर पडत असते. सध्या ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ८०४४ इतकी आहे. ग्रंथालयाचा भरपूर उपायोग घेणे व त्याचबरोबर ग्रंथालयाची नासधूस होणार नाही याची दक्षता घेणे हे प्रत्येक विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे.

२) ग्रंथालयासंबंधी सर्व नियम ग्रंथालयाच्या सूचना फलकावर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लावलेले असतात. या नियमासंबंधीची सर्व माहिती ग्रंथपालाकडून मिळू शकेल. ठराविक मुदतीपेक्षा जास्त दिवस पुस्तक जवळ ठेवल्यास अथवा पुस्तकाची पाने फाडली गेल्यास दंड आकारला जाईल.

३) ग्रंथालय ही सर्व विद्यार्थ्यांची संपत्ती आहे. पण काही विद्यार्थी ग्रंथाची पाने फाडणे किंवा नासधूस करणे हा प्रकार करतांना आढळतात. अशा विद्यार्थ्यांकडून ग्रंथाच्या किंमतीच्या दुप्पट रक्कम वसूल केल्या जाईल. या शिवाय अशा विद्यार्थ्यांना मिळणारी ग्रंथालयाची सवलत दोन महिन्यासाठी स्थगित करण्याचा अधिकार ग्रंथपालांना राहील.

४) ग्रंथालयाचा भरपूर उपयोग विद्यार्थ्यांनी करावा अशी अपेक्षा आहे. विशेष बाब म्हणजे आजी व माजी विद्यार्थांनी आपल्या वाढदिवसाला किमान १ पुस्तक स्वःच्छेने देऊन ग्रंथालय समृद्ध करण्यास मदत करावी व ग्रंथालयाशी कायम स्वरुपी जोडल्या जावे.

टीपः विद्यार्थ्यांना त्यांच्या फक्त ग्रंथालय कार्डवरच पुस्तके देण्यात येतील. त्यांनी ओळखपत्र घेऊन ग्रंथालयात यावे. पुस्तके ७ दिवसानंतर जवळ ठेवल्यास विद्यार्थ्यांना दररोज १ रु. दंड होईल.

**ग्रंथालयाचे नियम –**

१. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर ३० दिवसाचे आत ग्रंथालय कार्ड काढावे.
२. ग्रंथालय कार्ड घेतांना प्रवेशपावती व ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.
३. ग्रंथालयातून पुस्तकांची मागणी करतांना विद्यार्थ्यांना आपले ओळखपत्र दाखवावे लागेल त्याशिवाय पुस्तके दिली जाणार नाही.
